# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१५/०५/२०१९

## दि.१४/०५/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे १५०/१९,भादविक ४६७,४६८,४७१,४२० |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५७ वर्षे,रा.फातीमानगर,पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०२/२०१४ रोजी कॅनरा बॅंक,भवानी पेठ शाखा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने डायमंड शाखा,बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,मुंबई या शाखेकडील बॅंकेतील ग्राहकाने ज्वेलर्सचे नावाचा चेक हा बनावट तयार करुन,तो खरा आहे असे भासवुन,त्याव्दारे ९ लाख रुपये फिर्यादी यांचे बॅंकेतुन काढुन घेवुन,फिर्यादी यांचे बॅंकेची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पी.आर.शिकलगर ९८२२१३७६९६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोढवा पो स्टे ४२४/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-२३ वर्षे,रा.कौसरबाग कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईल व बॅंकेचा खातेधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०३/२०१९ ते दि.१५/०३/२०१९ रोजीपर्यन्त फोनव्दारे तसेच बॅंकेचे खातेमधुन ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी मार्च २०१९ मध्ये 1)naukri.com, 2)shine.com 3)indeed.com यावर नोकरीसाठी ऑनलाईन ॲप्लीकेशन केले होते. यातील अज्ञात मोबाईल व बॅंकेचा खातेधारक यांनी फिर्यादीस इंडीगो एअरलाईन्स बायोमेडीकल जॉबसाठी विचारणा करुन,त्यांना नोकरीसाठी निवड झालेचे सांगुन,मेलवरून जॉब लेटर पाठवुन,नमुद बॅंकेचे खातेधारक यांचे खात्यावर २,१००/- रुपये भरावयास सांगुन,नमुद भरलेली रक्कम फिर्यादी यांनी परत मागितली असता,सदरची रक्कम देण्यास नकार देवुन,फिर्यादी यांची नोकरी देण्याचे अमिष दाखवुन आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. अनिल पाटील ९९२३७८६९९९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ४१७/१९,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | मुक्ताबाई जवळकर,वय-६५ वर्षे,रा.मुं.पो.आळंदी म्हातोबाची,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम वय ३५ ते ४० वयोगटातील एक इसम, एका इसमाने रेघाचे शर्ट व पुढे टक्कल असलेला व दुस-या इसमाने पांढ-या रंगाचा हाफशर्ट घातलेला, दोघेही मराठी बोलीभाषा बोलणारे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०५/१९ रोजी १५/१५ वा. हनुमान मंदिरा जवळुन जुन्या कॅनॉल जवळील विधाते कॉलनी जवळ हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया हडपसर गाडीतळावरुन हडपसर गाव येथे त्यांचे मुलीकडे जात असताना,यातील नमुद वर्णनाचे दोन अनोळखी इसमांनी,फिर्यादी यांना तुमच्या गळ्यातील दागिने काढुन द्या,मी तुम्हांला सोन्याचे बिस्कीट देतो अशी बतावणी करुन,फिर्यादी यांना कसलेतरी पिवळ्या धातुचे बिस्कीट देवुन,त्यांचा विश्वासघात करुन,फिर्यादी यांचे गळ्यातील सोन्याचे दागिने ४८,०००/- रु किचे फसवणुक करुन घेवुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. डोके ८६५२१४७५७५ |

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** लष्कर पो स्टे २२४/१९,भादविक ३८७,५०६(२),३२३,४२७, आर्म ॲक्ट ४(२५)

**फिर्यादी** एक पुरूष,वय-४३ वर्षे,रा.गुलटेकडी,पुणे

**आरोपी** १.आदित्य ऊर्फ मन्या भोसले,वय-२८,रा.ताज बेकरी समोर भवानी पेठ,पुणे २.सुशील दिनेश भडकवाल,वय-२७,रा.भवानी पेठ,पुणे ३.संतोष ऊर्फ बाळा रघुनाथ गायकवाड,वय-३५,रा. मोदीखाना कॅम्प,पुणे ४.डेनलील डिक्रुज जोन्स,वय-३५,रा.वॉचमेकर भवानी पेठ,पुणे (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१४/०५/२०१९ रोजी ११/०० वा. कल्पतरु अपार्टमेंट शॉप नं.१,२,३ येथील वाईन्सचे दुकानात

**तपशिल** यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचे वाईन्स दुकानाचे काचेवर कोयत्याने मारुन,आम्हाला हप्ते चालु करा नाहीतर तुम्हाला जीवे ठार मारू असे बोलुन,त्यानंतर अदित्य व सुशिल या दोघांनी कोयता हातात घेवुन,फिर्यादी यांचे गळ्या जवळुन भिरकवला व फिर्यादी यांना दोन लाख रुपये खंडणी दे,नाहितर तुला व तुझा भाऊ यास मारुन टाकीन असे म्हणुन सिमेंटचे ब्लॉकने दुकानातील रॅकवर मारुन,दुकानातील दारुच्या बाटल्या फोडुन सुमारे १,१०,०००/- रु किचे नुकसान केले. तसेच क्लासिक स्वेअर सोसायटी मधील भवानी पेठ,पुणे येथील जनरल स्टोअर्स दुकानाचे काऊंटरची काच फोडुन,त्यांचा भाऊ हा मध्ये पडला असता,त्यांनी त्यास कोयता दाखवुन,तु पुढे आलास तर,तुला जीवे ठार मारीन असे म्हणुन तेथील हार्डवेअरचे दुकानाची काच फोडली. तसेच भवानी पेठ,पुणे येथील एंटरप्रायसेस दुकानात जावुन, दुकानातील ऑफिसची काच कोयत्याने फोडुन,दुकानातील मालकावर कोयता उगारुन,एक इसमाचा जो मॅटर आहे तो क्लोज कर,नाहीतर तुला मारुन टाकीन असे म्हणुन तुकाराम यांना पोटात व डोक्यात हाताने मारहाण केली आहे.

**त.अंमलदार** म.सहा.पो.निरी. व्हि.एन.शिंदे ८३०८३२५१९५

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** येरवडा पो स्टे ३५८/१९,भादविक ३७९

**फिर्यादी** एक महिला,वय-३३ वर्षे,रा.नेहरुनगर,उल्हासनगर,जि.ठाणे

**आरोपी** अज्ञात इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१४/०५/२०१९ रोजी सकाळी १०/३० ते ११/०० वा.चे दरम्यान साठे बिस्किट बस स्टॉप विश्रांतवाडी ते डेक्कन कॉलेज येरवडा,पुणे या दरम्यान आळंदी ते स्वारगेट या रूटचे बसने प्रवास करीत असताना

**तपशिल** यातील फिर्यादी हया साठे बिस्किट बस स्टॉप विश्रांतवाडी ते डेक्कन कॉलेज येरवडा,पुणे या दरम्यान आळंदी ते स्वारगेट या रूटचे पीएमपीएमएल बसने प्रवास करीत असताना, कोणीतरी अज्ञात इसमाने बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे जवळ असलेल्या बॅगेची चैन उघडून,त्यामध्ये ठेवलेले एकुण ७८,०००/- रुपये किचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ही चोरी करण्याचे उद्देशाने चोरून नेली आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. आर.व्हि.शेवटे ८९७५७५२५५४

## <u>दि.१४/०५/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१

**पो.स्टे.गुरनं./कलम** विश्रांतवाडी पो स्टे १८२/१९,भादविक २७९,३३८,४२७,मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७

**फिर्यादी** रोहित क्षेत्रिय,वय-१९,रा.टिंगरेनगर,पुणे

**आरोपी** कारचालक इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१५/०५/२०१९ रोजी पहाटे ०२/०० वा. सावंत पेट्रोल पंपासमोर विश्रांतवाडी,पुणे येथे

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रासह मोटार सायकलवरून जात असताना,नमुद कार चालकाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे मोटार सायकलला जबर ठोस मारून,मोटार सायकलचे नुकसान करून,फिर्यादी यांना उजवे पायांचे मांडीला फॅक्चर करून,त्यांचे मित्र दिपक यांचे डोक्यास गंभीर दुखापत करण्यास कारणीभुत झाला. (फिर्यादी व मित्र दिपक यांनी डोक्यावर हेल्मेट घातले नाही.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.एस.चौगुले ९९२१५२२१८५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**